N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. District (जिल्हा): ठाणे शहर **P.S.(ठाणे):** अम्बरनाथ **Year (वर्ष):** 2020

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0656 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/12/2020 01:49 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):

1. Day(दिवस): मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 22/12/2020

Time Period (कालावधी): पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/12/2020

**Time From (वेळेपासून):** 15:10 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:10 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date (दिनांक ):** 23/12/2020 **Time (वेळ):** 01:00 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ

Entry No. (नोंद क्र.): 012 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/12/2020 01:49 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 0.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) Address (पत्ता): कर विभाग, ,अंबरनाथ नगरपरीषद, अंबरनाथ प ,अंबरनाथ , 421501

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): जितेंद्र दत्ताराम साळवी

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1985 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.): **Date of Issue (दिल्याची तारीख):**

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दुर्गा माता मंदिर,महालक्ष्मी नगर, टेकडी विभाग,अंबरनाथ पूर्व,अंबरनाथ पूर्व,अम्बरनाथ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | दुर्गा माता मंदिर,महालक्ष्मी नगर, टेकडी विभाग,अंबरनाथ पूर्व,अंबरनाथ पूर्व,अम्बरनाथ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. देवसिंग ठाणसिंग पाटील | | | 1. 01,वानखेडे बंगल्याजवळ,,ललिता कुंज कोऑपहौसोसा,बदलापूर पूर्व,बदलापूर पूर्व,अम्बरनाथ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

मी. जितेंद्र दत्ताराम साळवी, वय - 35 वर्षे धंदा- व्यवसाय, राहणार- महालक्ष्मी नगर, टेकडी विभाग, दुर्गा माता मंदिर, अंबरनाथ पूर्व मो.नं - 9767611363 मी, वरील प्रमाणे असून सदर ठिकाणी मी गेल्या 25 वर्षापासुन माझे आई व पत्नीसह भाडेतत्वावर रहावयास आहे. मी श्रीमती फातीमा मौला अब्दुल शेख, वय 40 वर्षे, रा. मंदाकिनी भोर शाळेजवळ, भास्करनगर, अंबरनाथ (पश्चिम), जि. ठाणे यांच्याकडून मौजे मोहोज खुंटवली, भास्करनगर, मारी मंदिराजवळ अंबरनाथ (पश्चिम), ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील चाळीतील रुम दि. 22/10/2020 रोजी कायम खरेदीखतान्वये विकत घेतली आहे. मी विकत घेतलेल्या घरास अंबरनाथ नगरपरिषदेची कर आकारणी होत नसल्याने घरास नवीन कर (टक्स) आकारणी करण्याकरीता मी अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ येथे दि. 03/11/2020 रोजी कागदपत्रांसह रितसर अर्ज केला होता. माझे घरास नविन कर आकारणी करणेकामी अंबरनाथ नगरपरिषद येथे अर्ज करून दिड महिन्याहून अधिक कालावधी होवुनही कर आकारणी न झाल्याने मी माझे वरील प्रलंबित अर्जासंदर्भात दि. 15/12/2020 रोजी अंबरनाथ नगरपरिषद येथे जावून तेथील संबंधित कर निरीक्षक श्री. देवसिंग पाटील, यांना भेटलो व त्यांना मी दिलेल्या अर्जाची पोहच पावती दाखवून मी खरेदी केलेल्या घराचे नवीन कर (टक्स) आकारणी बाबत विचारणा केली असता, कर निरीक्षक श्री. पाटील, यांनी मी काम करुन देतो, मला 5600/- रु. दयावे लागतील असे सांगितले. सदरची रक्कम ही मला जास्तीची वाटल्याने, माझ्याकडे सध्या पैसे नाहीत असे म्हणून मी तेथून घरी निघून आलो व नवीन कर (टक्स) आकारणी शुल्काबाबत मी माझे ओळखीचे लोकांकडे खात्री केली असता, नवीन कर (टक्स) आकारणी करिता शासकिय शुल्क म्हणून 1600/- असल्याचे तसेच सदरची रक्कम हि अर्जदार यांनी स्वतः अंबरनाथ नगरपरिषद येथे जावून कर भरणा केंद्रामध्ये जमा करणे आवश्यक असलेबाबतची माहिती मला मिळाली. तसेच सदरबाबत मी अधिक माहिती घेतली असता कर निरीक्षक यांना कर आकारणी शुल्क रोखीने स्विकारण्याबाबत अधिकार नसल्याचे मला समजले. तरी लोकसेवक श्री पाटील यांनी माझे घराचे नविन कर आकारणी करण्याकरीता शासकिय शुल्क 1600/- रुपये असतांना तसेच त्यांना शुल्काची रक्कम स्विकारण्याचे अधिकार नसतांना देखील त्यांनी माझे कडे रू 5600/- लाचेच्या रकमेची मागणी केली परंतु मला पाटील यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांचे विरूध्द कारवाई होणेसाठी दि. 21/12/2020 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे स्वहस्ताक्षरातील लेखी तक्रार दिलेली आहे. सदर तक्रारीच्या अणुषंगाने पो.नि. योगेश देशमुख यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करुन त्यांना माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीगत सांगून माझे तक्रारीचे अनुशंगाने पुढिल पडताळणी कारवाई करण्याचा निर्णय घेवुन अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथुन अंबरनाथ येथे आलो. मी दिलेल्या तक्रारीच्या अणुषंगाने पोनि देशमुख यांनी पडताळणी करावयाची असल्याचे सांगून पंचांसमक्ष सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून पडताळणी कारवाईकामी, मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं.01 यांचेसह कर विभाग, अंबरनाथ नगरपरीषद, अंबरनाथ या कार्यालयात कर निरीक्षक श्री पाटील यांची भेट घेणेकामी पाठविण्याचा निर्णय घेतला.

त्याप्रमाणे पोनि देशमुख यांनी मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पाठविले असता, कर निरीक्षक श्री पाटील यांनी माझे घराचे नविन कर आकारणी करणेकामी माझेकडे 5600/- रूपये (अक्षरी-पाच हजार सहाशे रुपये) सदर लाचेची मागणी करून लाचेची रक्कम दि. 22/12/2020 रोजी घेवुन येण्यास सांगितले. सदरवेळी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री पाटील, कर निरीक्षक, अंबरनाथ नगरपरीषद यांनी माझेकडे माझे घराचे नविन कर आकारणी करणेकरीता लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरचे संभाशण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्डमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर सदर पडताळणी पंचनाम्याची कारवाई अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात रितसर पुर्ण करण्यात करून मला, पंचाना तसेच सापळा पथकातील कर्मचारी यांना दिनांक 22/12/2020 रोजी सापळा पूर्व व सापळा पंचनामा कारवाई करणेकामी सकाळी 10.00 वा. अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात उपस्थित राहणेबाबत सूचित करण्यात आले. त्याप्रमाणे दिनांक 22/12/2020 रोजी सकाळी 10.00 वा. अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात हजर झालो. दिनांक 21/12/2020 रोजी माझेकडे श्री पाटील यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम 5600/- लोकसेवक यांना देण्याकरीता, माझे कडील शिल्लक रक्कमेतून पोनि देषमुख यांचेकडे हजर केली. मी हजर केलेले सर्व नोटांचे नंबर नोंद करून सदर लाचेच्या रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावून ती रक्कम, माझे नेसुस शर्ट पुढिल डाव्या खिशात ठेवून दिली. त्यानंतर आपण सर्व सदर सापळा कारवाईकामी अंबरनाथ पश्चिम येथे निघालो. त्यानंतर युनिव्हर्सल केमीकल ॲण्ड इंडस्ट्रीयल कंपनी, प्लॉट नं. सी 1 सी 2, अंबरनाथ एमआयडीसी, के.बी.रोड, अंबरनाथ (प.) येथे आल्यानंतर पोनि/देशमुख यांनी मला, पंचाना व सापळा पथकास कारवाई दरम्यान घ्यावयाच्या काळजीबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर श्री पाटील हे कार्यालयात उपस्थित असलेबाबत माझे मोबाईल वरून श्री. पाटील यांचे मोबाईलवर फोन करून खात्री करून घेतली. श्री. पाटील कार्यालयात असल्याने सापळा कारवाई कामी पोनि देशमुख यांचे सुचनेवरून पोशि/कडव यांनी माझे शर्टचे आतील बनियनमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच साक्षीदार नं.1 यांचेसमवेत कर विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ या कार्यालयात श्री पाटील यांची भेट घेणेकामी पाठविले. त्यानंतर मी व पंच श्री कोळेकर असे माझे दुचाकी वाहनाने तसेच सापळा पथक षासकिय वाहनाने अंबरनाथ नगरपरीषद येथे आलो. पोनि/देशमुख यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पडताळणी पथक कर विभाग, अंबरनाथ नगरपरीशद कार्यालयाच्या आसपास थांबून राहिले. त्यानंतर मी व पंच नंबर 1 यांचेसह श्री. पाटील यांचे कार्यालयात गेलो व त्यांना माझे प्रलंबित कामाबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मला थोडावेळ थांबण्याबाबत सांगितले. त्यांनतर काही वेळाने लोकसवेक श्री पाटील हे मला कार्यालयाचे बाहेर घेवुन गेले. त्यानंतर पुन्हा कार्यालयात आल्यावर लोकसेवक श्री पाटील यांनी मला लाचेची रक्कम टेबलवर ठेवण्यास सांगितली असता मी माझे शर्टचे पुढिल डाव्या खिशातील लाचेची रक्कम माझे उजव्या हाताने काढुन त्यांचे टेबलवरील कल्क्युलेटरवर ठेवली व वरील कार्यालयाचे बाहेर येवुन पो.निरी देशमुख हे असलेल्या ठिकाणी येवून लोकसेवक पाटील यांनी लाचेच्या रकमेचा स्विकार केला असलेबाबत पूर्वनियोजित इशारा केला असता लागलीच पो.निरी देशनुख व [illegible] संपूर्ण सापळा पथक कर विभागामध्ये दाखल झाले. त्यावेळी पोशि/कडव यांनी माझे ताब्यातील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद करून आपले ताब्यात घेतला. सदर वेळी पोनिरी देशमुख यांनी मला लाचेच्या रकमेचा स्विकार करणारे इसम कोण याबाबत विचारणा केली असता मी श्री पाटील यांचेकडे बोट दाखवून त्यांनीच माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी करुन सदर रक्कम मला त्यांचे टेबलवर ठेवून देणेस सांगितल्याने मी लाचेची रक्कम त्यांचे टेबलवरील कल्क्युलेटरवर ठेवुन दिली असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनिरी देशमुख यांनी सदर इसम यांनजवळ जावून त्यांचे दोन्ही हात कषासही स्पर्श होणार नाहीत अशा पध्दतीने मनगटाजवळ घट्ट पकडून ठेवले. त्यानंतर पो.निरी देशमुख यांना स्वतःची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील कर्मचारी यांची ओळख श्री पाटील यांना करुन दिली. यानंतर पो. नि. देशमुख यांनी [illegible] पंचांसमक्ष लाचेच्या रकमेचा स्विकार करणारे इसम यांना त्यांचे संपूर्ण नाव विचारले असता, त्यांनी आपले नांव श्री. देवसिंग ठाणसिंग पाटील, वय-54 वर्षे, मूळ पद-लिपीक, अतिरिक्त कार्यभार- कर निरीक्षक, अंबरनाथ नगरपरिषद, राह. रुम नं.1, ललिता कुंज को.ऑप.हौ.सोसा., वानखेडे बंगल्याजवळ, बदलापूर पूर्व असे सांगितले. सापळा कारवाई दरम्यान केलेल्या तपासणीत श्री पाटील यांचे कडुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली असुन त्यावर अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म आढळुन आले. हस्तगत नोटांचे नंबर पडताळले असता ते सापळापुर्व कारवाई दरम्यान नोंद केलेल्या नंबरप्रमाणे जुळुन आले. वरील कारवाईबाबत दिनांक 22/12/2020 रोजीचा सापळापुर्व-सापळा पंचनामा करण्यात आला आहे. एकंदरीत दिनांक 21/12/2020 रोजी केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये श्री. देवसिंग ठाणसिंग पाटील, वय-54 वर्षे, मूळ पद-लिपीक, अतिरिक्त कार्यभार- कर निरीक्षक, अंबरनाथ नगरपरिषद, राह. रुम नं.1, ललिता कुंज को.ऑप.हौ.सोसा., वानखेडे बंगल्याजवळ, बदलापूर पूर्व यांनी माझे घराचे नविन कर आकारणी करणेकरीता माझेकडे 5,600/- रू. लाचेची मागणी करून सदर लाचेची कर विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ येथे स्विकारतांना सापळा पथकाने त्यांना दि. 22/12/2020 रोजी 15.10 वा रंगेहात पकडले आहे. म्हणून माझी त्यांचे विरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.

**13.Action (केलेली कारवाई): Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or (किंवा)**

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): SANDIP SUDHAKAR KHADE
Rank (पद): SI (Sub-Inspector)
No.(क्र.): **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) Refused Investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.**A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SANJAY NARAYAN DHUMAL
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार
अंबरनाथ पोलीस स्टेशन